आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 12/05/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 123 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# स्वच्छ पिंपरी चिंचवडसाठी नागरिकांनी पुढाकार घ्या-महापौर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड शहर स्वच्छतेत देशात अव्वल स्थानावर नेण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले. स्वच्छ सर्वेक्षण 2025-26 अंतर्गत नागरिकांचा अभिप्राय हा शहराच्या विकासाचा महत्त्वाचा आधार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**



महापौर रवि लांडगे म्हणाले की, शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी नागरिकांचे मत अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रशासनाच्या प्रयत्नांना साथ देत प्रत्येकाने आपला अभिप्राय नोंदवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनीही नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

"मी माझा अभिप्राय दिला आहे, आपणही जरूर नोंदवा," असे सांगत महापौर रवि लांडगे यांनी नागरिकांना पुढाकार घेण्याचे आवाहन केले.नागरिकांना https://cf.sbmurban.org या संकेतस्थळावर जाऊन सहजपणे आपला अभिप्राय नोंदवता येणार आहे. पिंपरी चिंचवडला देशात स्वच्छतेत अग्रक्रमांक मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असेही महापौर रवि लांडगे यांनी नमूद केले आहे.

तर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनीही नागरिकांना सहभागाचे आवाहन करत म्हटले की, "स्वच्छ सर्वेक्षण 2025-26 मध्ये नागरिकांचा अभिप्राय हा शहराच्या गुणवत्तेचा आणि प्रगतीचा आरसा आहे. तुमच्या मतांमुळे शहरातील सेवा अधिक प्रभावी आणि नागरिकाभिमुख बनू शकतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपला अभिप्राय नोंदवून शहराच्या विकासात सक्रिय योगदान द्यावे.

# झाडांच्या छाटणीसाठी विशेष पॉलिसी बनवणार-आमदार जगताप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या लाखो नागरिकांना दिलासा देणारा एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात येणार आहे . सोसायट्यांच्या आवारातील झाडांच्या छाटणीसाठी (ट्रीमिंग) महापालिकेकडून आता एक स्वतंत्र 'विशेष पॉलिसी' (धोरण) तयार केली जाणार आहे. यामुळे या छाटणीचा संपूर्ण आर्थिक भार आता सोसायट्या आणि पर्यायाने नागरिकांवर पडणार नाही असे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.**



शहरातील पायाभूत सुविधा, वाहतूक कोंडी, पर्यावरण आणि नागरी सुविधांच्या संदर्भात सोमवारी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या समवेत पार पडलेल्या अत्यंत महत्त्वाच्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, शहर अभियंता मनोज सेठीया, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, बापू गायकवाड, प्रेरणा सिनकर आणि अजय सूर्यवंशी यांसह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

सध्या महापालिकेच्या माध्यमातून केवळ सार्वजनिक जागांवरील झाडांची छाटणी केली जाते, मात्र खाजगी सोसायट्यांच्या आवारातील झाडांच्या छाटणीसाठी कोणतीही आर्थिक किंवा प्रशासकीय तरतूद नव्हती. परिणामी, पावसाळ्यापूर्वी किंवा एरवी झाडांची छाटणी करताना सोसायट्यांना स्वतःच्या खिशातून मोठा खर्च करावा लागत असे. आता नवीन पॉलिसीमुळे नागरिकांची या आर्थिक त्रासातून मुक्तता होणार आहे. यासोबतच, पर्यावरण संवर्धनाचा भाग म्हणून शहरातील निर्माणाधीन (अंडर-कन्स्ट्रक्शन) रस्त्यांचे काम पूर्ण होण्यापूर्वी रस्त्याच्या कडेला प्रत्येक दोन पोलच्या मध्ये किमान एक झाड लावणे बंधनकारक करण्याचे निर्देश आमदार जगताप यांनी दिले आहेत.

दरम्यान रेडी मिक्स काँक्रीट प्लांटमुळे होणाऱ्या वायुप्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी पीसीएमसी , पीएमसी , एमपीसीबी आणि जिल्हाधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. आरएमसीबाबत तयार करण्यात आलेल्या एसओपीचे उल्लंघन करणाऱ्या तब्बल 150 बांधकाम व्यावसायिकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

यापुढे पर्यावरण मंजुरीच्या अटी-शर्तींमध्येच आरएमसीच्या नियमांचा समावेश केला जावा अशी सूचना आमदार जगताप यांनी केली आहे. शहरातील सार्वजनिक शौचालयांचा सर्व्हे सुरु करण्यात आला असून, आगामी प्रारूप विकास आराखड्यात दर्जेदार शौचालयांसाठी राखीव जागा ठेवली जाणार आहे. विशेषतः महिलांसाठी "शी" शौचालयांची उभारणी करण्यासाठी सीएसआर फंडातून तरतूद करावी. तसेच, पिंपळे सौदागर येथे पोस्ट ऑफिससाठी जागा राखीव ठेवण्यात यावी अशी सूचना देखील करण्यात आली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 12/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 'शिवरुद्र शंभुराजे' च्या पहिल्या महानाट्याला शिवशंभूप्रेमींची भरभरुन दाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - 'छत्रपती शिवाजी महाराज की जय...', 'छत्रपती संभाजी महाराज की जय...', 'जय भवानी, जय शिवाजी....' च्या जयघोषात आणि स्वराज्याच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या नेत्रदीपक दृश्यांनी चिंचवड येथील छत्रपती संभाजीनगर परिसरातील बर्ड व्हॅली उद्यानाच्या मागील बाजूस असलेल्या मोकळ्या मैदानाचा परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज विचार प्रबोधन पर्व' अंतर्गत सादर करण्यात आलेल्या 'शिवरुद्र शंभुराजे' या भव्य महानाट्याच्या पहिल्या प्रयोगाला शिवप्रेमींनी प्रचंड प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.**



या प्रबोधन पर्वाचे उदघाटन उपमहापौर शर्मिला बाबर,आयुक्त डाॅ.विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते तर माजी महापौर मंगला कदम, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, तसेच क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले यावेळी नगरसदस्य तुषार हिंगे, कुशाग्र कदम, मंदार देशपांडे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, योगिता नागरगोजे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, शिव शंभू शाहू जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष संजय कुरबेट्टी, उपाध्यक्ष हेमा पारिसकर, संभाजी ब्रिगेडचे प्रविण कदम, सतीश काळे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर म्हणाले, त्यागाचे सर्वात मोठे उदाहरण 'छत्रपती संभाजी महाराज त्यांच्या जयंतीनिमित्त भव्य-दिव्य सोहळा शहरात होत आहे ही अभिमानाची बाब आहे. असे आवाहन देखील त्यांनी केले.छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान व प्रेरणा अशा महोत्सवांमधून लोकांपर्यंत पोहोचत आहेत,या कार्यक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद खूप चांगला मिळत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक प्रसंग अनुभवण्यासाठी शहरातील नागरिकांनी या महानाट्यास उपस्थित रहावे असे आयुक्त डाॅ.विजय सुर्यवंशी म्हणाले.

उदघाटन कार्यक्रमानंतर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित शिवस्पर्श शिवसह्याद्री प्रतिष्ठान निर्मित, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर, विनय चंद्रकांत दाभाडे लिखित, दिग्दर्शित व प्रतिक चंद्रकांत दाभाडे सह-दिग्दर्शित भव्य महानाट्याच्या प्रयोगाला सुरुवात झाली.

या प्रयोगात सुमारे 200 हून अधिक कलाकारांनी सहभाग नोंदवत छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक प्रसंग जिवंत केले. घोडे, उंट, भव्य नेपथ्य, पारंपरिक वेशभूषा, अत्याधुनिक प्रकाशयोजना, प्रभावी ध्वनीसंयोजन आणि नेत्रदीपक आतषबाजीच्या सहाय्याने उभारण्यात आलेल्या प्रत्येक दृश्याला उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# कुदळवाडी, जाधववाडी परिसरातील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेची निष्कासन कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मौजे चिखली, कुदळवाडी आणि जाधववाडी परिसरातील अनधिकृत बांधकामांवरआज रोजी निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये 4 हजार 336.28 चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली.**




या कारवाईमध्ये मौजे कुदळवाडी येथील विसावा चौक ते पोलीस चौकी रस्त्यावरील गट क्रमांक 700 मधील अनधिकृत पत्राशेड, जाधववाडी रस्ता येथील गट येथील अनधिकृत वीट बांधकाम पत्राशेड, कुदळवाडी पोलीस चौकीजवळील गट क्रमांक 678 मधील अनधिकृत आरसीसी बांधकाम तसेच सावता माळी मंदिर रस्ता, जाधववाडी येथील अनधिकृत पत्राशेड अशा विविध बांधकामांवर कारवाई करण्यात आली.सदर कारवाई महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यामध्ये बांधकाम परवानगी विभागाचे 12 उपअभियंते, 4 कनिष्ठ अभियंते, 24 स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बीट निरीक्षक), धडक कारवाई पथकातील 8 क्षेत्रीय कार्यालयांतील कर्मचारी, महापालिका पोलीस कर्मचारी तसेच पोलीस विभागाचे सुमारे 1200 अधिकारी व कर्मचारी आणि 218 एमएसएफ जवान सहभागी झाले होते.सदर कारवाईसाठी 10 पोकलेन, 10 जेसीबी, 50 मजूर, 3 अग्निशमन वाहने आणि 2 रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या होत्या. तसेच महापालिका प्रशासनासह वीज वितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांनीही कारवाईत सहभाग घेतला.

# घराची चावी विश्वासाने दिली; तरुणाने केले 4.47 लाखांचे दागिने लंपास

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड प्रतिनिधी | युनूस खतीब**

**विश्वासाने घराची चावी दिल्यानंतर त्याचाच गैरफायदा घेत तब्बल साडेचार लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची धक्कादायक घटना बोपखेल परिसरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी दिघी पोलिसांनी पंजाबमधील एका तरुणाविरोधात चोरी आणि धमकीचा गुन्हा दाखल केला आहे.**




ही घटना 6 मे ते 10 मे 2026 दरम्यान शिवनंदन पार्क, गणेशनगर, बोपखेल येथील फ्लॅट क्रमांक 203 मध्ये घडली. याप्रकरणी मनीषा दिपक हिरवळे (वय 38) यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मनीषा हिरवळे या काही दिवसांसाठी कोल्हापूर येथे गेल्या होत्या. घरातील मांजरींना खायला देण्यासाठी त्यांनी विश्वासाने घराची चावी आरोपी अवतार सिंघविर सिंघ सोहल याच्याकडे दिली होती. आरोपी हा सध्या बोपखेल परिसरात भाड्याने राहत असून मूळचा पंजाबमधील जालंधर येथील रहिवासी आहे.दरम्यान, 7 मे रोजी आरोपीने फिर्यादीला फोन करून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. "काम सोडून चार-चार दिवस निघून जाते, आता तुला दाखवतो... तुझा जीव घेतो... तुला माझ्या मागे पंजाबपर्यंत यायला लावतो," अशी धमकीही आरोपीने दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

यानंतर फिर्यादी घरी परतल्यानंतर घरातील लाकडी कपाटातील ड्रॉवरचे लॉक उघडून ठेवलेले दिसून आले. तपासणी केली असता 14 तोळे 9 ग्रॅम वजनाचे सुमारे 4 लाख 47 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे उघड झाले.

या प्रकरणी दिघी पोलिसांनी आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता कलम 305, 316(2) आणि 351(2) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

या घटनेमुळे बोपखेल परिसरात खळबळ उडाली असून, विश्वासू व्यक्तींनाही घराची जबाबदारी देताना नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# पत्नी व मुलावर धारदार वस्तूने जीवघेणा हल्ला

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड प्रतिनिधी | युनूस खतीब**

**तळवडे येथील रुपीनगर परिसरात कौटुंबिक वादातून दारूच्या नशेत असलेल्या पतीने पत्नी आणि मुलावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी चिखली पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली असून त्याच्याविरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**




ही घटना रविवारी (दि.10 मे) पहाटे साडेबारा वाजण्याच्या सुमारास गायकवाड बिल्डिंग, इंद्रायणी हौसिंग सोसायटी, रुपीनगर, तळवडे येथे घडली. याप्रकरणी मानसी सुभाष उत्तेकर (वय 40) यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मानसी उत्तेकर या पती सुभाष केशव उत्तेकर आणि मुलगा ज्ञानेश्वर यांच्यासह घरी होत्या. त्यावेळी आरोपी सुभाष उत्तेकर हा दारूच्या नशेत घरी आला होता. घरी आल्यानंतर त्याने शिवीगाळ सुरू केली. त्यामुळे मानसी यांनी घरातील लाईट बंद करून त्याला झोपण्यास सांगितले. मात्र, याच कारणावरून आरोपी संतापला.

संतप्त झालेल्या आरोपीने घरातील पट्ट्याने पत्नीला बेदम मारहाण केली. त्यानंतर कोणत्यातरी धारदार वस्तू अथवा हत्याराने पत्नीच्या गळ्यावर वार केला. आरोपीचा राग इतक्यावरच थांबला नाही. त्याने मुलगा ज्ञानेश्वर याच्यावरही हल्ला करत त्याच्या हनुवटीवर, खांद्यावर, गळ्यावर आणि हातावर वार केले.

या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

घटनेची माहिती मिळताच चिखली पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आरोपी सुभाष उत्तेकर याला ताब्यात घेतले. त्याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 118(2), 118(1), 115(2), 352 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेमुळे रुपीनगर परिसरात एकच खळबळ उडाली असून, कौटुंबिक हिंसाचाराच्या वाढत्या घटनांबाबत नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. पुढील तपास चिखली पोलीस करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 12/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# राज्यस्तरीय महापौर चषक स्पर्धेत वाघजाई आणि राजमाता जिजाऊ संघ विजेता

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - 'महापौर चषक ही केवळ स्पर्धा नसून राज्यातील नवोदित खेळाडूंना मोठ्या व्यासपीठावर स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी आहे. पिंपरी चिंचवड शहर क्रीडा संस्कृतीला चालना देणारे शहर म्हणून ओळख निर्माण करत आहे, आणि अशा स्पर्धांमधून भविष्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडतील, असा विश्वास आहे,' असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. या स्पर्धेत पुरूष गटात वाघजाई तर महिला गटात राजमाता जिजाऊ संघ विजेता ठरला आहे.**




महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा - महिला गट प्रथम क्रमांक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा 2026' चा समारोप व पारितोषिक वितरण महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी आमदार महेश लांडगे, विधानपरिषद सदस्य माजी मंत्री सचिन अहिर, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक सभापती कैलास कुटे, नगरसदस्या भीमाताई फुगे, नगरसदस्य शीतल उर्फ विजय शिंदे, सागर गवळी, दत्ता गव्हाणे, सचिन तापकीर, माजी नगरसदस्य विलास मेडिगिरी, पंडितराव गवळी, सहाय्यक कामगार आयुक्त अश्विनी साकोरे, उपायुक्त पंकज पाटील यांच्यासह क्रीडाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या स्पर्धेत पुरुष गटात रत्नागिरीच्या वाघजाई कबड्डी संघाने शानदार कामगिरी करत महापौर चषक पटकावला, तर महिला गटात पुण्याच्या राजमाता जिजाऊ संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

पुरुष गटात वाघजाई कबड्डी संघ रत्नागिरी प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला तर शिवमुद्रा संघ कोल्हापूर द्वितीय, बारामती स्पोर्ट क्लब बारामती तृतीय आणि सतेज संघ पुणे चतुर्थ क्रमांकावर राहिले.महिला गटात राजमाता जिजाऊ संघ पुणे यांनी प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले तर शिवशक्ती संघ मुंबई द्वितीय, बारामती स्पोर्ट क्लब बारामती तृतीय आणि धर्मवीर कबड्डी संघ नंदुरबार यांनी चतुर्थ क्रमांक मिळवला.स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिकांमध्ये पुरुष गटात साहिल पाटील यांना "सर्वोत्कृष्ट खेळाडू" म्हणून बुलेट प्रदान करण्यात आली तर अर्जुन तडस यांना पंचाहत्तर हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात आले. "सर्वोत्कृष्ट चढाई" पुरस्कार अजिंक्य पवार यांना चेतक गाडी देऊन प्रदान करण्यात आला तर अजित चव्हाण यांना पन्नास हजार रुपये आणि चषक देण्यात आला. "सर्वोत्कृष्ट पकड" या प्रकारात शुभम शिंदे यांना चेतक गाडी तर वैभव रबाडे यांना पन्नास हजार रुपये व चषक प्रदान करण्यात आला.

महिला गटात निकिता पडवळ यांना "सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू" म्हणून चेतक गाडी देण्यात आली तर मृणाली भुवड यांना पंचाहत्तर हजार रुपये व चषक प्रदान करण्यात आला. "सर्वोत्कृष्ट चढाई" प्रकारात सोनाली शिंगटे यांना चेतक गाडी तर मनिषा बारटक्के यांना पन्नास हजार रुपये व चषक देण्यात आला. "सर्वोत्कृष्ट पकड" पुरस्कार ऋतुजा तिगडे यांना चेतक गाडी आणि हर्षदा सोनवणे यांना पन्नास हजार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

# दर्शन रावलने 'ओन्ली माईन' गाण्याने रंगवला प्रेमाचा माहोल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : 10 मे रोजी कोथरुड येथील पेठकर ग्राउंडवर आयोजित करण्यात आलेल्या 'साऊंड ऑफ लव्ह' या पुणे कॉन्सर्टमध्ये दर्शन रावलने आपल्या सुरांनी पुन्हा एकदा जादू केली. नेहमीप्रमाणेच रावलने आपल्या चाहत्यांवर प्रेमाची मोहिनी घातली, मात्र यावेळी ती अधिक खास ठरली कारण त्याने नुकतेच प्रदर्शित झालेले 'ओन्ली माईन' हे गाणे प्रथमच लाईव्ह सादर केले. भावपूर्ण शब्द आणि आकर्षक संगीतामुळे प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.



'ओन्ली माईन' या गाण्याचा मुख्य विषय म्हणजे मन व्यापून टाकणारे प्रेम — असे नाते जे अनंत आणि भारावून टाकणारे वाटते. आपल्या आधीच्या सुपरहिट गाण्यांमध्ये प्रेमातील गोडवा दाखवणाऱ्या दर्शनने 'ओन्ली माईन'मध्ये प्रेमातील सुंदर गोंधळ आणि समर्पणाची भावना अधोरेखित केली आहे. हाच वेगळेपणा प्रेक्षकांच्या मनाला भिडला. कॉन्सर्टपूर्वी दर्शनने आपल्या 'ब्लू फॅमिली'ला (त्याच्या चाहत्यांना) गाण्याचे शब्द पाठ करण्याचे आवाहन केले होते आणि त्यामुळे संपूर्ण मैदानात 'ओन्ली माईन'सह त्याच्या इतर लोकप्रिय गाण्यांचे सूर घुमत होते.

इतर कॉन्सर्ट्सपेक्षा वेगळे म्हणजे, दर्शन रावलने आपल्या प्रेमगीतांमधून प्रेक्षकांना रोमँसची कोमलता आणि सूक्ष्म भावना अनुभवायला लावल्या. त्यामुळे हा कॉन्सर्ट फक्त 'वाइब' करण्यापुरता न राहता, प्रत्येकाने तो मनापासून 'फील' केला. आणि कदाचित म्हणूनच प्रेक्षक आता दर्शनकडून आणखी काही खास ऐकण्यासाठी अधिक उत्सुक झाले आहेत. त्याच्या या नव्या कॉन्सर्टला आणि 'ओन्ली माईन' गाण्याला मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहता, 2026 च्या उत्तरार्धात अपेक्षित असलेल्या त्याच्या आगामी अल्बममध्ये लाईव्ह इन्स्ट्रुमेंटेशनचा प्रभाव अधिक जाणवू शकतो


शबनम न्यूज मिडिया ग्रुप प्रस्तुत
शानदार सशक्त नारी
पुरस्कार सोहळा
शानदार सशक्त नारी पुरस्कार 2026
सक्षम महिला बचत गट सन्मान
सशक्त नारी सन्मान
शुभ हस्ते
ॲड.रुपालीताई पाटील ठोंबरे
संस्थापक अध्यक्षः झाशीची राणी प्रतिष्ठान.
कार्याध्यक्षः राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, पुणे शहर.
प्रमुख उपस्थिती
सौ.सुलभाताई उबाळ
नगरसेविका पिं.चिं.मनपा
सौ.प्रियाताई अण्णा बनसोडे
सामाजिक कार्यकर्त्या
सौ.प्रियंकाताई प्रवीण बारसे
मा.नगरसेविका पिं.चिं.मनपा
सौ.सोनालीताई तुषार हिंगे
संचालिका : आरंभ सोशल फाउंडेशन
सौ.किरणताई हर्षवर्धन भोईर
सामाजिक कार्यकर्त्या
सनशाईन ग्राफिक्स : 8379928399
शनिवार दि.16 मे 2026 रोजी दुपारी 3:30 वा.
स्थळ : तारांगण सभागृह, सायन्स पार्क,चिंचवड,पुणे-३३
आयोजक
SHABNAM NEWS
शबनम सय्यद
• संपादिका : शबनम न्युज
• संस्थापक अध्यक्षा : शमीम हुसेन फाउंडेशन